**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेला सहा वर्षं पूर्ण-पंतप्रधानांच्या हस्ते १९वा हप्ता जारी
- राज्य सरकार प्रधानमंत्री कृषी सन्मान योजनेंतर्गत आणखी अतिरिक्त ३ हजार रुपये देणार, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची घोषणा
- २०३६ पर्यंत उच्च शिक्षणासाठीच्या नोंदणीत ५० टक्के वाढ करण्याची क्षमता मुक्त विद्यापीठात असल्याचं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचा विश्वास
- कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना झालेल्या शिक्षेला नाशिक जिल्हा न्यायालयाची स्थगिती
- आंबेडकरी चळवळीतले लोकशाहीर प्रभाकर पोखरीकर यांचं निधन

**आणि**

- दिवसअखेर साडे आठशेहून अधिक अंकांची घसरण नोंदवून सेन्सेक्स ७५ हजारांच्या खाली बंद

**<><><><><>**

देशातल्या कृषी उत्पादनांच्या निर्यात, प्रक्रिया आणि विपणनाला सरकार प्रोत्साहन देत आहे. जगातल्या प्रत्येक स्वयंपाकघरात किमान एक तरी भारतीय पदार्थ असावा असं आपलं स्वप्न असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज बिहारमध्ये भागलपूर इथं प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा १९वा हप्ता जारी केल्यानंतर ते बोलत होते. ते म्हणाले...

९ कोटी ८० लाख शेतकऱ्यांच्या खात्यात यावेळी सुमारे २२ हजार ७०० कोटी रुपयांचं अर्थसहाय्य जमा झालं. मखाण्याच्या उत्पादनाला प्रोत्साहन देणं हा देखील एक महत्त्वाचा उपक्रम असून यासाठी स्वतंत्र मंडळाची स्थापना झाल्यानंतर जागतिक बाजारपेठेत मखाण्याची निर्यात वाढू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अन्नप्रक्रिया क्षेत्रात प्रगती करण्याची क्षमता पूर्व भारताकडे असून बिहार या क्षेत्रात प्रगती करू शकतो, असंही प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

प्रधानमंत्र्यांनी यावेळी बिहारमध्ये भागलपुर, मुंगेर आणि बक्सर इथे आंबा, टोमॅटो, कांदा आणि बटाटा या पिकांना प्रोत्साहन देण्यासाठी तीन नवीन सेंटर ऑफ एक्सलन्सची घोषणाही केली. भागलपूर इथे आणकी एका केंद्रीय विद्यापीठाची स्थापना करण्यात येईल, अशी घोषणाही प्रधानमंत्र्यांनी यावेळी केली. तत्पूर्वी प्रधानमंत्र्यांनी कृषी आणि त्याच्याशी संबंधित क्षेत्रांच्या ७०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विकास प्रकल्पांचं उद्घाटन केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री कृषी सन्मान योजनेंतर्गत मिळणाऱ्या रकमेत राज्य शासनातर्फे ३ हजारांची वाढ करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. नागपूर इथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रधानमंत्री कृषी सन्मान योजनेत मिळणारे ६ हजार रुपये आणि राज्य शासनाच्या नमो कृषी सन्मान योजनेचे ६ हजार रुपये शेतकऱ्यांना मिळतात. त्यात आता राज्य शासनाकडून ३ हजार रुपयांची वाढ करण्यात येत असून शेतकऱ्यांच्या खात्यात लवकरच १५ हजार रुपये जमा होतील. या योजनेच्या माध्यमातून छोटे शेतकरी तसंच शेतीउत्पादक गटांना फायदा

होत असून शेतकऱ्यांना वीज बिल माफी, सौर पंप योजना या योजनांचाही लाभ होत असल्याचं फडणवीस यावेळी म्हणाले.

<><><><><>

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात विकसित करण्यात येणारी तिसरी मुंबई देशातल्या सर्वात प्रगत शहरांपैकी एक असेल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. मुंबईत नॅसकॉम टेक्नॉलॉजी अँड लीडरशीप समिट मधे मुलाखतीत एका प्रश्नाला उत्तर देताना ते आज बोलत होते. तीनशे एकरमधे वसवल्या जाणाऱ्या या शहरामधे तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण संशोधन, आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यावर भर दिला जाणार आहे. तसंच राज्यात मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक इथं जीसीसी पार्क विकसित करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून राज्य शासन प्रशासन आणि अर्थव्यवस्थेला गती देत असून महाराष्ट्र लवकरच भारताच्या कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञान क्रांतीचं नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला. राज्यात डिजिटल सेवांचं प्रमाण वाढलं असून बहुतांश शासकीय सेवा ऑनलाईन उपलब्ध झाल्या आहेत, असं फडनवीस यांनी सांगितलं.

ॲग्री स्टॅट उपक्रमा अंतर्गत संपूर्ण शेती प्रक्रियेचं डिजिटायझेशन करण्यात येत आहे, तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतीचं उत्पन्न दुप्पट करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असं फडनवीस म्हणाले.

<><><><><>

प्रधानमंत्री सूर्यघर- मोफत वीज  योजनेतून आतापर्यंत  साडेनऊ लाखांहून जास्त सौर उर्जा संयत्र लावली गेली आहेत अशी माहिती केंद्रीय नवीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज दिली.  नवीकरणीय उर्जा  निधीपुरवठा कार्यशाळेच्या निमित्ताने मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भारत २०३० पर्यंत ५०० गिगावॅट्स वीज निर्मितीचं उदिष्ट गाठणार आहे. त्यासाठी दरवर्षी ५० गिगावॅट्स नवीकरणीय उर्जेची भर घालण्याचं आपलं उद्दिष्ट आहे असं ते म्हणाले. नवीकरणीय उर्जा मंत्रालयानं घेतलेल्या कार्यशाळेतून देशातल्या नवीकरणीय उर्जा क्षेत्रातल्या गुंतवणूक आव्हानांवर लक्ष केंद्रीत झाल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

भारतामध्ये २०३६ पर्यंत उच्च शिक्षणासाठीच्या नोंदणीत ५० टक्के वाढ करण्याचं  स्वप्न फक्त मुक्त आणि दूरस्थ शिक्षण क्षमतेचा वापर करूनच साकारता येईल असं प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज नाशिक इथं केलं. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाच्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. परदेशी भाषांसह इंग्रजीचे लघु अभ्यासक्रम विद्यापिठाने सुरु करावेत अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

<><><><><>

नाशिकमधल्या आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ विदयापीठाचे कुलपती आणि राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांच्या हस्ते आज झाला. वैद्यकीय क्षेत्रात अनेक क्रांतिकारी बदल हाेत असून, आयुर्वेद उपचाराला आधुनिकतेची जोड मिळाली आहे. जग कितीही बदलले, तरी मानवता हाच

डॉक्टरांचा खरा धर्म आहे अन् तो डॉक्टरांनी तो जाेपासावा, असे आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना झालेल्या शिक्षेला नाशिक जिल्हा न्यायालयानं स्थगिती दिली आहे. उद्या सरकारी वकील युक्तीवाद करणार आहेत. त्यानंतर पुढील निर्णय होणार असल्याचं कोकाटे यांचे वकील अविनाश भिडे  यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री कोट्यातून दिल्या जाणाऱ्या सदनिका या बनावट दस्तऐवज तयार करून लाटल्या प्रकरणी कोकाटे आणि त्यांचे बंधू यांना दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा कनिष्ठ न्यायालयानं ठोठावली होती. सध्या ते जामीनावर आहेत.

<><><><><>

आंबेडकरी चळवळीतले ज्येष्ठ गीतकार, संगीतकार, गायक लोकशाहीर प्रभाकर पोखरीकर यांचं आज अल्प आजारानं निधन झालं. ते ६० वर्षांचे होते. प्रभाकर पोखरीकर मूळचे पुणे जिल्ह्यातल्या आंबेगाव तालुक्यातल्या पोखरी गावचे होते. मुंबईत आल्यानंतर त्यांची कारकीर्द बहरली. “जिवाला जीवाचं दान” हा त्यांचा अल्बम, तसंच “छाती ठोकून सांगू जगाला” हे त्यांचं गाणं विशेष गाजलं. ठाण्यात कळवा इथल्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात त्यांची प्रणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर आज रात्री ८ वाजता चैत्यभूमीजवळच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

लोकशाहीर प्रभाकर पोखरीकर यांच्या निधनानं आंबेडकरी चळवळीची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे, अशा शब्दांत केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खासगी बससाठी येत्या शैक्षणिक वर्षापासून नियमावली निश्चित करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज केली. परिवहन विभागाच्या बैठकीदरम्यान त्यांनी ही माहिती दिली. नियमावली निश्चित करण्यासाठी निवृत्त परिवहन अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमण्यात आली असून पुढच्या एक महिन्यात या संदर्भातला अहवाल सादर करावा, अशा सूचना देण्यात आल्याचं सरनाईक यावेळी म्हणाले. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन ही नियमावली लागू केली जाणार असल्याचंही ते म्हणाले.

<><><><><>

जागतिक बाजारातल्या वाढत्या व्यापार तणावामुळे परदेशी गुंतवणूकदारांच्या विक्रीचा ओघ कायम राहिल्याने भारतीय शेअर बाजारात आज सलग पाचव्या सत्रात घसरण कायम राहिली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज  ८५७ अंकांनी घसरण झाली आणि तो ७४ हजार ४५४ अंकांवर बंद झाला. आयटी, टेलिकॉम अशा क्षेत्रांच्या समभागांमध्येही घसरण पाहायला मिळाली. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २४२ अंकांची घसरण नोंदवत २२ हजार ५५३ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

नवी मुंबई  कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदावर आज   कोकण विभागीय संचालक प्रभू गोविंद पाटील यांची,  तर  उपसभापती पदावर हुकूमचंद आमधरे यांची बिनविरोध निवड झाली. बाजार समितीच्या प्रशासकीय इमारतीत पार पडलेल्या या निवडणूकीत  बाजार समितीच्या १६  आणि शासनानं  निर्देशित केलेल्या ५ सदस्यांनी मतदान केलं.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात कार्यरत असलेल्या केंद्रीय राखीव दलाच्या एका जवानानं आज सकाळी गोळी झाडून आत्महत्या केली. हा जवान मूळचा उत्तरप्रदेशचा निवासी असून, तो धानोरा पोलिस ठाण्यात तैनात होता.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात कोकण, मध्य महाराष्ट्र, आणि मराठवाड्यात   तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित वाढ झाली, तर विदर्भात काही ठिकाणी किंचित घट झाली.     राज्यात सर्वात कमी किमान तापमान अहिल्यानगर इथं १२ पूर्णांक ३ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात कोकणात यलो अलर्ट जारी केला असून मध्य महाराष्ट्र मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**